# साधना

संस्थापक : साने गुरुजी

शनिवार
१८ ऑक्टोबर २००८
मूल्य रु. १०.००

## बालकुमार विशेषांक

दिवाळी २००८



# काडेपेटी आणि इतर विज्ञान खेळणी

मूल्य ४० रुपये



# टाकाऊतून शिकाऊ

मूल्य ३५ रुपये





तुमच्या मुलातही
एक वैज्ञानिक लपलेला असतो.
त्या वैज्ञानिकाला
शोधायचं असेल तर
अरविंद गुप्ताच्या
या तीन पुस्तकांसोबत
त्याला खेळू द्या.
आणि पाहा काय गंमत होते.
खेळातून विज्ञान शिकविणारी
तीन धम्माल पुस्तके.

# खेळण्याचा खजिना

मूल्य ३० रुपये

मूल्य प्रत्येकी ६०रुपये







माणूस का घोरतो?
आपल्याला भूक का लागते?
चिंच बघून तोंडाला
पाणी का सुटतं?
असे अनेक प्रश्न
आपल्याला पडतात,
पण याची उत्तरं माहिती असलेलं
कोणीच आपल्याजवळ नसतं.
यासाठी आम्ही
आमच्या लहान मित्रांसाठी
एकदम सोप्या, रंजक भाषेतील
आणि भरपूर चित्रं असलेली
ही पुस्तके घेऊन आलो आहोत.
नक्की वाचा.

# मेडिकल जनरल नॉलेज

भाग १ ते ५

डॉ. जगन्नाथ दीक्षित
डॉ. अंजली दीक्षित

# शाळेपासून मुक्ती

व र्षा पु र ती



राहुल अल्वारिस
भाषांतर
उष:प्रभा पागे

दहावी पास झाल्यानंतर
इतर मुलांप्रमाणे शाळेत न जाता
मन मानेल त्या गोष्टी करायचं
राहूलनं ठरवलं.
'शाळेपासून मुक्ती' ही त्याच्या
शाळेबाहेर व्यतीत केलेल्या
एका वर्षाची गोष्ट आहे.

मूल्य ९० रुपये

## खास बालमित्रांसाठी मनोविकास प्रकाशनची पुस्तके

मनोविकास
प्रकाशन

३ए शक्ती टॉवर्स,
६७२नारायण पेठ,
पुणे३०

पुणे-०२०-६५२६२९५०
मुंबई-०२२-६४५०३२५३

# बालकुमार मित्रांनो

स्थापण्या<br>समता शांती<br>ठेवुनी शुद्ध<br>**साधनां ।**<br>करिती साधना<br>त्यांना ठेवो<br>उत्स्फूर्त<br>**साधना**

साने गुरुजींनी साठ वर्षांपूर्वी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. 'साधना'मध्ये मुलांसाठी हक्काची दोन पानं असतातच; पण यावेळी, दिवाळी अंकात मुलांना 'थोडी' जागा देण्यापेक्षा, मुलांसाठी एक 'स्वतंत्र' अंकच असावा, असं वाटलं. आणि हा अंक फक्त तुम्हा सर्वांसाठी म्हणजे, बालकुमारांसाठी असावा असंही ठरवलं.

या अंकात दोन विभाग आहेत. ८ ते ११ या वयोगटातील मुलांसाठी 'बालसाधना' आणि १२ ते १५ या वयोगटातील मुलांसाठी 'कुमारसाधना'.

राजीव तांबे गेली अनेक वर्षे सातत्याने मुलांसाठीच लिहीत आहेत. ते आजचे सर्जनशील आणि प्रयोगशील लेखक आहेत. म्हणून बालसाधनाची जबाबदारी त्यांच्यावर टाकली. मे-जूनमध्ये 'साधना'ने घेतलेल्या स्पर्धेतील विजेत्यांचे लेख कुमारसाधनात घेतले आहेत. यातील पहिल्या पाच कथा या स्पर्धेतील आहेत. गिरीश सहस्रबुद्धेंकडे अंकाची सजावट सोपवली. चित्रकला आणि सजावट हा त्यांचा खास प्रांत आहे.

एक आनंदाची बातमी म्हणजे, पुणे येथील रयत शिक्षण संस्थेचे 'साधना प्राथमिक विद्यामंदिर' आणि 'साधना इंग्लिश मीडियम स्कूल' या दोन शाळांतील ३३६० विद्यार्थ्यांनी या अंकाची प्रकाशनपूर्व नोंदणी केली. त्या सर्वांना हा दहा रुपये किंमतीचा अंक पाच रुपयांत मिळणार आहे. याच दोन शाळांमध्ये राजीव तांबे व गिरीश सहस्रबुद्धे यांच्या हस्ते १७ ऑक्टोबरला या अंकाचे वितरण होणार आहे.

या अंकातील लेख वाचून, चित्रे पाहून तुम्हांला काय वाटले ते पत्राने आम्हांला जरूर कळवा. तुमचे पालक व शिक्षक यांनाही पत्र लिहायला सांगा.

बालकुमार मित्रांनो, पुढच्या वर्षीही मुलांसाठीच्या लेखनाची स्पर्धा घेऊ, असाच स्वतंत्र अंक तयार करू आणि जास्तीत-जास्त शाळांना तो सवलतीच्या दरात देण्याचा प्रयत्न करू. यासाठीच तर आम्ही तुमच्या 'दिवाळी पत्रां'ची वाट पाहतोय.

**– संपादक**


**१८ ऑक्टोबर २००८**
वर्ष ६१ / अंक १०

- संपादक: **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक: **विनोद शिरसाठ**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी साथीदार प्रिंटर्स, पुणे ३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, बॅ. गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०,** येथे प्रकाशित केले
- **दूरध्वनी : वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी,** (020) 24451724, **संपादक : टेलिफॅक्स :** 24432402
  E-mail : ssadhana@vsnl.net • साधना मीडिया सेंटर :- (020) 24459635/41
  Website : www.sadhanatrust.com
  वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/-
  (या अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
- मुखपृष्ठ आणि सजावट : **गिरीश सहस्रबुद्धे** Mob. 9850150488



# अनुक्रम

## बालसाधना


फुलपाखरू - राजीव तांबे-५

पार्टी - राजीव तांबे - ९

फुले फुलली - राजीव तांबे - १२

जीराफ - राजीव तांबे - १४

जोडी - राजीव तांबे - १६

मंगू आणि मुंगू - राजीव तांबे -१८



**राजीव तांबे :** ए/२०२, पौर्णिमा दर्शन, श्रीखंडे वाडी, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे. मोबा. : ९३२२३९९८५९.


## कुमारसाधना


हातगाडी - अवधूत डोंगरे - २०

शरदचा मामा - विवेक राजेंद्र मुंबरकर - २२

आम्हाला पण शिकायचं आहे -कमल राजाज्ञा - २५

प्रेरणा- पुष्पप्रभा प्रभाकर बोकील - २८

त्याला परत कामावर घ्या- साईनाथ पाचारणे - ३०

प्रसाद - आकाश पांढरे - ३३

# फुलपाखरू

राजीव तांबे

ही आहे छोट्याशा
बब्बडची गोष्ट!
बब्बड आहे फक्त
अकरा महिन्यांची
आणि गंमत म्हणजे,
'बब्बडच सांगते आहे
तिची गोष्ट..!'



संध्याकाळ झाली. मला नटवलं. म्हणजे मला पावडर लावली,तिटी लावली. डोक्यावर तेल थापलं. माझे चकोटी केस विंचरले.

मग माझा 'सू सू' चा कार्यक्रम झाला..

आणि मगच आईने मला नवीन दुपट्यात गुंडाळलं. अगदी सैल सैल.

मग मला पाळण्यात ठेवून, आईने स्वत:ची तयारी केली. माझ्या आवडीची निळ्या रंगाची फुलाफुलांची साडी नेसली. ही साडी खूप मऊ मऊ आहे. आईच्या खांद्यावर मान टाकली तर, बागेत झोपल्यासारखं वाटतं!

आमची तयारी होईपर्यंत बाबासुध्दा आले.

बाबा म्हणाले,''चला,चला. आज आपल्याला शॉपिंगला जायचं आहे. बब्बडसाठी स्पेशल शॉपिंग बरं का!''

बाबांची ही भाषा मला समजत नाही. मला समजेल असं बाबा का बोलत नाहीत बरं? आंघोळीला जायचं,दूध प्यायला जायचं, झोपायला जायचं हे मला समजतं. पण

'शॉपिंगला जायचं' म्हणजे काय?

माझ्या मनातलं ओळखून आई म्हणाली,''अहो, बब्बडला नीट सांगा कुठं जायचं आहे ते? तिचा चेहरा बघा कसा गोंधळलाय तो.'' माझ्याकडे पाहात बाबा म्हणाले,''अगं बबडे, शॉपिंग म्हणजे तुझ्यासाठी गंमत जंमत घ्यायची आहे. एकदम 'हाय-फाय' शॉपिंग!''

हां! मला समजलं. 'हात-पाय शॉपिंग!' म्हणजे हाताच्या पायाच्या वस्तू घ्यायच्या आणि गमती-जमती करायच्या!! मी सैल दुपट्यात 'हात-पाय हलविंग' केलं आणि ......

बाबा खूश झाले. माझे हात पाय चेपिंग करत म्हणाले,''अगं बबडीला समजलं बरं 'हाय फाय' शॉपिंग!

कुंकू लावत आई म्हणाली,''आहेच माझी बब्बड हुशार!'

आम्ही सर्व निघालो.

निघताना घरात अंधार होता आणि रस्त्यावर झगमगाट,चकचकाट,लुकलुकणारे दिवे. उघड बंद होणारे दिवे. रंगीबेरंगी दिवे. वेगवेगळ्या आकारांचे दिवे. आणि गंमत म्हणजे..

मोटारी,रिक्शा,स्कूटर तर आपल्या पुढे पाठी दिवे अडकवून फिरत होत्या! मी भांबावून गेले. गोंधळले. इकडं बघावं की तिकडं बघावं? मी मनात म्हटलं,''माझ्या या 'आडव्या आयुष्यात' (अजून मला मोठ्या माणसांसारखं हात सोडून उभं राहता येत नाही) मी प्रथमच संध्याकाळी बाहेर पडले होते ना, म्हणून जरा गडबड.''

इतक्यात बाबांनी चटकन माझे दोन्ही कान बंद केले. मला कळेना हे काय झालं? की हेच ते 'हाय फाय' शॉपिंग? त्याचवेळी आमच्या बाजूने एक मोठी मोटार भों भों भों करत निघून





गेली आणि बाबांनी हुश्श केलं!

आम्ही एका चकमक-झगमग दुकानात गेलो. त्या दुकानात खूप रंगीबेरंगी कपडे टांगून ठेवले होते. मोठे मोठे आरसे होते. भरपूर दिवे होते आणि गंमत म्हणजे... सगळे पंखे बंद होते तरी गार गार हवा होती.

मला थोड्याच वेळात थंडी वाजू लागली. मी आईला घट्ट बिलगले. बाबा म्हणाले,''हं, या बब्बडसाठी छान मऊसूत फ्रॉक दाखवा.''

आँ? मला कळेना, एव्हढे फ्रॉक टांगून ठेवलेत तरी बाबा का बरं म्हणाले,'बब्बडसाठी फ्रॉक दाखवा'. मला वाटलं, बाबांनी बहुधा उन्हाचा काळा चष्मा घातला असणार. मी बाबांकडे नीट पाहणार तोच .. ..

बाबांनी मला आईकडून घेतलं आणि टेबलामागच्या माणसाकडे दिलं. त्यांनी मला टेबलावर आडवं ठेवलं. त्यांनी माझ्या पोटावर पट्टी गुंडाळली आणि माझे हात पाय चेपले!

मला समजलं, आता आपलं 'हात-पाय शॉपिंग' सुरू झालंय.

मी लाथा झाडून दुपटं सैल केलं. आळोखे पिळोखे देऊन हात मोकळे केले. याऽऽ फूर्रऽऽऽऽ करत थुंकी उडवली.

तो टेबला मागचा टकलू माणूस म्हणाला,''व्वा! पोरगं एकदम चंट आहे. नाव काय या मुलाचं?''

बाबा मला एक चापटी मारत म्हणाले,''अहो ही बब्बड आहे बब्बड! मस्तीखोर आहे, चंट आहे, चळवळी आहे.. ...''

बाबांना मधेच थांबवत आई म्हणाली,''आणि समजूतदारही आहे बरं! आपण बोललेलं सारं समजतं तिला.''

मग ते तिघेही माझ्याकडे बघून गोड हसले, 'जशी लहान मुलं हसतात तसे!'

त्या टकलू माणसाच्या मदतीला एक बाई आली. (पण ती टकलू नव्हती.) ती बाई खूप



चांगली होती. तिने दुकानात कुठे कुठे लपवून ठेवलेले फ्रॉक शोधून काढले. आमच्या समोर ठेवले.

हे फ्रॉक वेगवेगळ्या रंगांचे,पध्दतींचे,कापडांचे, आकारांचे आणि वेगवेगळ्या रंगांवर वेगवेगळ्या चित्रांचे होते.

आता आई-बाबांनी माझ्यासाठी फ्रॉक निवडायला सुरुवात केली. हा रंग, तो रंग. हे चित्र, ते चित्र. ही स्टाईल, ती स्टाईल. याचा मऊपणा आणि त्याचा मऊपणा वगैरे.

मला त्यातला गुलाबी रंगाचा एक फ्रॉक खूपच आवडला होता. त्या फ्रॉकवर फुलपाखराचं सुंदर चित्र होतं. ती बाई माझ्याकडे पाहात आईला म्हणाली, ''या गुलाबाच्या फुलासाठी हा फुलपाखराचा फ्रॉक घ्या.''

''अय्या! हा फ्रॉक बब्बडला छानच दिसेल'' असं म्हणत आईने चटकन माझं दुपटं सोडलं

आणि पटकन मला फ्रॉक घातला. बाबांनी मला उचललं आणि आरशासमोर नेलं. दुपट्यापेक्षा फ्रॉकमध्ये मी कितीतरी वेगळी दिसत होते. एकदम स्मार्ट, मस्तीखोर आणि चंट!!!

मी आनंदाने हात पाय झाडले. बाबा मला कसंबसं सावरत म्हणाले,''अरे बापरे! हिला वाटतंय आपल्याला पंख फुटले की काय? या फुलपाखराला नीट धरलं पाहिजे.'' मला तर आनंदानं ओरडावसं वाटत होतं..

.. आणि तोच चमत्कार झाला.. .. .. मी ओरडणार होते, तोच तोंडातून शब्द फुटले,''आऽऽऽऽऽ ईऽऽ'' माझं मलाच आश्चर्य वाटलं! मला ही क्षणभर कळेना, हे कसं काय झालं? आईनं मला बाबांकडून हिसकावून घेतलं. माझे पटापट मुके घेतले, मला आंजारलं-गोंजारलं. मला छातीशी घट्ट धरलं. मग बाबांनी मला जवळ घेतलं. माझं नकटं नाक ओढलं. मला थोपटलं आणि .. ... आणि मी पाहाते तर काय, आई-बाबांचे डोळे पाण्याने डबडबले होते. बाबांच्या तोंडातून तर शब्दच फुटत नव्हता. त्यांचे ओठ फक्त थरथरत होते. डोळ्यातलं पाणी आता गालावर येणार होतं. मी बाबांकडे पाहात आनंदाने ओरडले,''आऽऽऽईऽऽ'' आणि बाबांच्या डोळ्यातल्या पाण्याने माझे गाल भिजले. बाबा ओल्या डोळ्यांनी हसत

म्हणाले,''आज बब्बडला शब्दांचे पंख फुटले!'' आई म्हणाली,''बबडीने मला 'आई' म्हणताच मलाच पंख फुटले.'' आम्ही सर्व फुलपाखरं एकमेकांकडे उडत-उडत पाहू लागलो. न बोलताच बोलू लागलो.

■■

# पार्टी

राजीव तांबे

**जगात भूत नसलं तरी...
भूतांच्या गोष्टी मात्र असतात!
आणि मुलांना मदत करणाऱ्या
प्रेमळ भुताच्या गोष्टी तर
चिक्कार असतात.
ही त्यातलीच एक खरीखुरी गोष्ट!
प्रेमळ भूताची गोष्ट!!**

मला निबंध लिहिण्याचा जाम कंटाळा आहे. तरीपण हल्ली माझे निबंध मीच लिहितो. पण परवाचा खतरनाक प्रसंग घडलाच नसता तर, माझे निबंध मीच लिहायला काय चंपू आहे? आता तुमची बऱ्यापैकी उत्सुकता वाढली असेल म्हणून परवा काय लोच्या झाला ते डिटेल मधे सांगतो. त्याच्याआधी हा फ्लॅशबॅक सुरू करतो आणि त्यातूनच डायरेक्ट स्टोरी सुरू.

मागच्यावेळी बाईंनी निबंधाला विषय दिला 'माझा आवडता प्राणी'. मी लिहिलं, 'माझ्या आवडत्या प्राण्याला पाय नाहीत म्हणून तो चालत नाही. माझ्या आवडत्या प्राण्याला पंख आहेत तरी तो उडत नाही. माझा आवडता प्राणी पाण्यात राहातो तरी तो पाणी पीत नाही. पण कधी कधी त्याच्या डोळ्यात मात्र पाणी जाते. माझा आवडता प्राणी फिश मार्केट मधे राहातो. त्याचे नाव पापलेट. आम्ही त्याला रविवारी घरी आणतो. सगळे मिळून आवडीने खातो. मला हा प्राणी इतका आवडतो की मला 'रोजच रविवार असावा' असे वाटते.'

माझा सुंदर निबंध ऐकल्यावर बाईंचा चेहरा शिटी वाजणाऱ्या कुकरसारखा झाला. माझा कान धरत रागाने त्या म्हणाल्या,''हा काय निबंध? आणि तुला कुणी सांगितलं रे की पापलेट पाणी पीत नाही आणि त्याच्या डोळ्यात मात्र पाणी जातं म्हणून? आँ..?''

कसाबसा कान सोडवत बाईंना म्हणालो,''अहो बाई पापलेट घेताना त्याचा डोळा हळूच दाबतात. त्यातून पांढरं पाणी आलं तरच तो घेतात. हे काम तर मी आवडीने करतो! पापलेट समुद्रात राहतात. पापलेटने जर पाणी प्यायलं असतं तर सगळे पापलेट खारट नसते का लागले? बाईऽऽ पापलेट काय सॉलीड टेस्टी असतात माहित्यै? माझ्यातर आत्ताच तोंडाला पाणी सुटलंय! बाई तुम्हाला पण आवडतो ना हो पापलेट?''



शार्क माशासारखं बाईंनी माझ्याकडे पाहिलं. आणि अंगावर चढलेलं झुरळ झटकावं तशी त्यांनी माझी वही बाकावर टाकली. माझ्याकडे पाहात त्या म्हणाल्या,''थांब! पुढच्यावेळी तुझ्याकडे नीट पाहाते.'' यावेळी निबंधाचा विषय होता, 'माझे घर.' आता या विषयावर निबंध तो काय लिहिणार?

'आम्ही मुले घरी मोठ्यांची बोलणी खातो. मोठ्यांचा मार खातो. वेळ मिळाला तर अभ्यास करतो. आमच्या घरी मोठी माणसे सुखात आहेत कारण ती अजिबात अभ्यास करत नाहीत. आमच्याविषयी आम्ही खरं काय आहे ते लिहू शकत नाही.' असा खरा निबंध लिहिला तर बाई नक्कीच ओरडतील! म्हणून मी प्रेमळ भूताला बोलावलं.

मी डोळे बंद केले. मग उजव्या हाताच्या पहिल्या बोटावर दुसरं बोट घट्ट ठेवलं. डाव्या हाताच्या दुसऱ्या बोटावर पहिलं बोट नीट ठेवलं. ही बोटं एकमेकांना जुळवली. त्यांचा झाला छोटा चौकोन. त्या चौकोनात पूंच्क मारली तीन वेळा. आणि म्हणालो ''प्रेमळ भूत'' पाच वेळा.

त्याक्षणी खुदूखुदू हसत प्रेमळ भूत समोर आलं. ते म्हणालं,''बोल मित्रा बोल, मी काय करू? जगातली सगळी पुस्तकं एका क्षणात फाडू? की तुझ्यासाठी आणू एक लाडू?''

प्रेमळ भुताला थांबवत म्हणालो,''अरे असला आचरटपणा अजिबात करू नकोस. प्लीज माझा जरा निबंध लिही ना रे. आणि चुका न करता व चांगल्या अक्षरात! कळलं?''

आणि काय चमत्कार!! एका क्षणात माझ्या वहीत, 'माझं घर' हा निबंध उमटला. काळ्याभोर सुंदर अक्षरात!

मी निबंध न वाचताच वही बंद केली. प्रेमळ भूताला म्हणालो,''थँक्यू भुतोबा!.'' प्रेमळ भूत म्हणालं,''वेलकम लाडोबा!''

मी वही दप्तरात ठेवून खेळायला पळालो.

दुसरा दिवस उजाडला.

निबंध तपासायला बाई वर्गात आल्या. माझ्याकडे पाहात म्हणाल्या,''आधी याची वही पाहाते.'' मी ताठ उभा राहिलो, आणि वही बाईंना दिली. माझ्या वहीतलं पहिलं वाक्यं बाईंनी वाचलं आणि त्या मोठ्याने म्हणाल्या,''मी कुणालाच घाबरत नाही. तशी मी धीट आहे! समजलं?''

बाईंनी दुसरं वाक्यं वाचलं आणि त्या घाबरुन ओरडल्या,''अगं आऽऽईऽऽ ग! आज घरी गेल्यावर फक्त रामरक्षाच नाही तर अख्खं तुलसी रामायणच वाचावं लागणार!!



बाईंनी तिसरं वाक्यं वाचलं आणि त्या किंचाळल्या. जोरजोरात किंचाळत त्या थरथर कापू लागल्या!! त्यांनी कसबंसं चवथं आणि पाचवं वाक्यं वाचलं. त्यांचा चेहरा पांढरा फटक पडू लागला. डोळे गरगर फिरू लागले. त्यांनी हातातली वही भिरकावून मुठी गच्चं बंद केल्या आणि त्या जोरात किंचाळून बेशुध्द पडल्या. सगळा वर्ग घाबरला. मी पण भ्यायलो. मला कळेना, हे असं काय झालं? काय आहे तो निबंध? ती पहिली पाच वाक्यं आहेत तरी काय? मी भीत भीत जवळ गेलो. सावकाश खाली वाकून वही उचलली. आणि एका क्षणात सगळा घोटाळा माझ्या लक्षात आला.

निबंधाचा विषय 'माझं घर' असा होता. प्रेमळ भुताने निबंध लिहिताना 'त्याच्या' घराविषयी लिहिलं होतं!! त्यामुळे माझ्या निबंधातली पहिली पाच वाक्यं अशी होती : मी माझे आई-बाबा व आजी-आजोबा गावाबाहेरच्या स्मशानात आनंदाने राहातो. मी रोज रात्री बारा वाजता स्मशानात आजी सोबत कवटी दांडू खेळतो; त्यावेळी माझे आजोबा झाडावर उलटे लटकत असतात. पण आई मात्र मला प्रेमाने सतत नवीन कवट्या आणून देते. ह्या अमावस्येला मध्यरात्री, आमच्या घरी माझ्या वडिलांची 'मरण दिवसाची' पार्टी आहे. या पार्टीला बाई तुम्ही अवश्य या. तुम्ही आला नाहीत तर मी तुम्हाला घेऊन जायला नक्की येईन.

आता मला सांगा, असा खतरी निबंध वाचल्यावर आणखी काय होणार?

■■



# फुले फुलली

राजीव तांबे

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही.
फार फार पूर्वी फुलेच नव्हती.
कारण फुलांची अशी फुलझाडेच नव्हती.
प्रत्येक पान हेच फूल.
प्रत्येक पान सुवासिक.
प्रत्येक पान रंगीत.
पानांचे पण विविध आकार. पानांचे पण अनेक प्रकार.
प्रत्येक पानाचा रंगच वेगळा.
प्रत्येक पानाचा सुगंधच आगळावेगळा.



त्यामुळे, त्याकाळी सर्वजण,

हार करण्यासाठी, गजरे करण्यासाठी ... पानं तोडू लागले. माळा करण्यासाठी, तोरण करण्यासाठी...पानं तोडू लागले. रंग करण्यासाठी, अत्तर करण्यासाठी ... पानं तोडू लागले. गमतीसाठी आणि जमतीसाठीही झाडावरची पानं तोडू लागले.

त्यामुळे...

झाडावर पानं फुलण्याआधीच सारेजण पानं ओरबाडू लागली. झाडावरची पानं भराभर नाहीशी होऊ लागली.



झाडं ओकीबोकी झाली.
झाडांना कळेना...
ही पानतोड थांबणार कधी?
आणि ..
ही पानतोड थांबवायची कशी?
आणि खरंच, दुसऱ्या दिवसापासून. . .
काही पानांचा
सुवास नाहिसा झाला.
काही पानांना विचित्र उग्र वास मिळाला.
काही पानांचे सुंदर रंग उडून गेले.
तर काही पानांचे रंग फिके पडले.
काही पानांवर रंग अधेमधे रेंगाळले.
तर काही पानांचे वास आणि रंग
अधीक तीव्र झाले.
सगळीकडे हाऽहाऽकार माजला.
कुणालाच काही कळेना.
हा काय प्रकार आहे ते समजेना.
जिकडे तिकडे हाच विषय.
जो तो ज्याला त्याला विचारु लागला.

सगळे जण खाताना पिताना, चालताना झोपताना हाच विचार करू लागले. असं का झालं असेल?

सगळेजण सगळीकडे वणवण फिरून शोधू लागले. आणि इतक्यात,

पानांतूनच फुलांचा जन्म झाला!

कोवळ्या मऊ मऊ लुसलुशीत पानात गच्चं लपेटलेली इटुकली कळी, हिरव्यागार पानांतून हलकेच डोकावली. एकेक पान सावकाश अलगद उलगडत ती कळी हळूवारपणे फुलली. कळीतूनच टपोरे रंगीत सुवासीक फूल बहरुन बाहेर आले.

फूल लोकांना खुणावू लागले. वाऱ्यासंगे डोलू लागले. डोलता डोलता...

वाराच सुगंधी करू लागले.

ही रंगीत सुवासीक बातमी वाऱ्यासोबत पसरली. माणसं आनंदाने मोहोरली! आश्चर्याने थक्क झाली!! काही माणसं म्हणाली, ''पानं फुलली.'' तर काही माणसं म्हणाली, ''कळी फुलली.'' पण नंतर आनंदाने मुले ओरडली,

''वॉव! ही तर फुले फुलली!!''

■■

# जीराफ

राजीव तांबे

सगळ्या जीराफांच्या अंगावर मोठाले ठिपके. सगळ्या जीराफांची लंबू लांब मान. त्यांची पिटुकली शेपटी आणि इटुकले कान. जीराफ कधी बसत नाही. कधीच मोठमोठ्याने ओरडत नाही.

एका जंगलात असाच एक जीराफ होता. पण तो सगळ्यांपेक्षा थोडा वेगळा होता. तो सगळीकडे टुकूटुकु पाहायचा व टकाटक विचार करायचा. तो उडणारे गिरकणारे पक्षी पाहायचा. बागडणारे सरपटणारे प्राणी पाहायचा. उंच उंच झाडं व गोल गोल वेली पाहायचा. झुळझुळणारे झरे व खळाळणारी नदी पाहायचा. पाहता पाहता मनातल्या मनात विचार करायचा. त्याला वाटे, ''सगळ्या प्राण्यांप्रमाणे आपल्याला दोन डोळे, एक शेपटी व एक मान पण आहे. पण... पण...आपल्याला आपली मान खाजवता येत नाही. कुणाच्या पाठीवर शाबासकीची थाप मारता येत नाही.आपल्याला आपल्या डोळ्यातले अश्रू ही टिपता येत नाहीत. अरेरे! '' त्या जीराफाला हीच काळजी. हीच चिंता सतत. आकाशाकडे बघत तो विचार करत असे, ''काय करावे? कसे करावे? म्हणजे उपाय मिळेल? सहज आपला हात आपल्या मानेकडे वळेल. किंवा मित्राच्या पाठीवर आपली कौतुकाची थाप पडेल.''

त्या लंबूलांब जीराफाची लंबेलांब चिंता एका इटुकल्या पिटुकल्या खारीला कळली. खार





टुणटुणत झाडाच्या उंच फांदीवर जाऊन बसली. जीराफाशी गप्पा मारू लागली.

खार : अरे तुझ्या मनातलं सारं कळलं मला.

जीराफ : आँ? ते कसं काय?

खार : अरे आहेच मी मनकवडी.

जीराफ : म्हणजे?

खार : तुझी चिंता मला समजते. तुझी काळजी मला कळते. पण तुला एक गंमत माहीत नाही.

जीराफ : कोणती?

खार: अरे जीरू जीराफा, ही झाडं बघ. ही पानं बघ. ही फुलं बघ.

जीराफ : आँ! ते तर मी रोजच पाहातो. हे तर मी नेहमीच पाहात असतो.

खार: अरे जिरू मित्रा, तुझे हात सगळ्यांपेक्षा मोठे आहेत. तुझी बोटं मऊ-मऊ व गुलाबी आहेत. आणि मित्रा.. तुझी शाबासकी तर सुंदर सुवासिक आहे रे!!

जीराफ : म..मला नीट सांग बरं.... अं... हे सर्व खरं आहे का ग?

खार : अरे, तेच तर सांगते आहे तुला. ही जाडजूड उंच झाडं म्हणजे तुझे हात आहेत. या झाडांवरची ही कोवळी कोवळी पानं म्हणजे तुझी बोटं आहेत. आणि...

खारीला पुढे काही बोलू न देताच, जीराफाने झाडावरचं एक सुंदर फुल खुडलं आणि खारीच्या पाठीवरुन अलगद फिरवलं. जीराफाने खारीला सुंदर सुवासिक शाबासकी दिली!

तेव्हापासून सर्व जीराफ आपली मान झाडाला घासतात. आपल्या डोळ्यातले अश्रू कोवळ्या पानांनी टिपतात. आपल्या मित्रांना रंगीत सुवासिक शाबासकी देतात.

■■

दिवस-रात्र बागेतच राहायचं म्हणजे रात्री थंडीत कुडकुडायचं, पहाटे दवात भिजायचं आणि दिवसभर उन्हात तापून निघायचं. म्हणजे एकाच दिवशी उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा! त्यामुळे ते दोघे चांगलेच भिजले होते. मस्त गारठले होते.

हळूहळू सकाळ झाली.

त्याने हात ताणत साखळ्या हलवत आळस दिला. ती मात्र तशीच अवघडून उभी होती. सकाळी उन्हात अंग शेकायला तिला खूप आवडायचं. इतक्यात त्याने हातातल्या साखळ्या खुळखुळवल्या आणि जोरात म्हणाला,''हॅलोऽऽ हॅपी बर्थ डे! हॅपी सिल्हवर ज्युबिली!! अनेक छोट्या छोट्या मुलांना तू चढायला आणि घसरायला शिकवशील. त्यांना हसताना पाहशील. तू कायम त्यांच्या लक्षात राहशील. याच माझ्या तुला वाढदिवसाच्या शुभेच्छा!''

त्याच्या अशा बोलण्यावर तिला काही बोलताच आलं नाही. मागच्या आठवड्यात तीन माणसांनी मिळून तिला चांगल्या खरबरीत पॉलीश पेपरनं खसखसून घासलं होतं. मग तिला स्वच्छं पुसलं होतं. दोनच दिवसांपूर्वी तिला सुंदर रंगात रंगवलं होतं. आता आपला पंचवीसावा वाढदिवस आहे, हे तोपर्यंत तिला माहितच नव्हतं. तिला घासणाऱ्या आणि रंगवणाऱ्या माणसांचं बोलणं तिने ऐकलं, तेव्हा तिला काहीसं कळलं.

सकाळी उन्हं आल्यावर, जरा अंग तापल्यावर तिला मोकळं वाटलं.

''व्वा! आज तर तू अगदी टकाटक दिसते आहेस! मस्त रंगवलं आहे तुला. आज बागेत येणारी मुलं तर माझ्यापेक्षा तुझ्याकडेच जास्ती गर्दी करतील.'' त्याचं असं बोलणं ऐकल्यावर ती सुखावली.

तो पुढे म्हणाला,''काय गं, इतकी वर्षं जमिनीत पाय रोवून एकाच जागी उभं राहायचं म्हणजे भारीच काम आहे! कधी पुढं जाणं नाही, कधी पाठी जाणं नाही आणि नवीन काही पाहणं नाही. यामुळे तू अगदी कंटाळली असशील ना?''

आता मात्र आपण बोललं पाहिजे, असं तिने ठरवलं. घशातला रंग साफ करत ती म्हणाली,''अरे वेडुल्या आपल्याला कंटाळा येऊन कसा चालेल? हांऽ कंटाळा कधी येतो.. जेव्हा आपल्या जवळ मुलं नसतात तेव्हा! त्यावेळी आपण मुलांसोबत केलेली मज्जा आठवायची! मुलांचं हसणं आठवायचं! आपल्याभोवती गरगरणारा मुलांचा आनंद आठवायचा! मुलांचा निरागस स्पर्श आणि आपल्यावरचा मुलांचा नितांत विश्वास जरा जरी आठवला तरी कंटाळा फुलपाखरासारखा क्षणात उडून जातो. त्यावेळी आपण अतीव आनंदाने फुलासारखे डोलत असतो.''



हे असं बोलत असताना मुलांच्या आठवणीने त्या घसरगुंडीच्या अंगावर आनंदाने काटा आला! तिचा नवीन रंग सकाळच्या उन्हात चमचमू लागला!!

घसरगुंडी पुढे म्हणाली,''आणि झोपाळ्या, मी जरी एका जागी असले तरी फिरणारे सगळे माझ्याकडे येतात. त्यांच्याकडूनच मला नवनवीन गोष्टी समजतात. तुला सांगितलं तर खोटं वाटेल, पण मी दिवसा आकाशातले ढग आणि रात्री चमचमणाऱ्या चांदण्या पाहात असते. कारण ढग आणि चांदण्या आकाशात फिरत असल्या तरी ते मला खुणावत असतात, माझ्याशी बोलत असतात!''

साखळ्या खळखळवत झोपाळा म्हणाला,''मी काय किंवा ते तिकडचं लांबचं चक्र काय, आम्ही दोघे फिरतो किंवा पळतो. पण तू मात्र एका जागी स्थिर सूर्यासारखी!! सगळ्यांची आवडती गुंडीबुंडी!''

घसरगुंडी मनापासून शिडीपासून हसली.

ती म्हणाली,''अरे झोपाळ्या तुझ्यामुळे मुलांना ऊंच जाण्याची ओढ लागते. ऊंच झोका घेता-घेता भरारी मारावी अशी उर्मी त्यांच्यांत दाटून येते. पाय न टेकता सुध्दा आपण स्थिर राहू शकतो आणि स्वत:च्या हिमतीने वरही जाऊ शकतो, हा अनुभव मुलांना तुझ्यामुळेच मिळतो. म्हणून ,माझ्यापेक्षा तुझ्याकडे जास्ती गर्दी असली तर मला आनंदच होतो.''

हे ऐकताच झोपाळ्याला भरुन आलं.

आपल्या ओलसर साखळ्या मंदपणे हलवत झोपाळा म्हणाला,''ताई, तरीपण तू एक गोष्ट विसरलीस. जेव्हा तुझ्यामुळे मुलांची ऊंचावरून खाली घसरत येण्याची भीती जाते तेव्हाच ही मुले माझ्याकडे येतात. कारण तेव्हाच त्यांना खालून वर जाण्याची, ऊंच जाण्याची ओढ लागलेली असते. तुझ्यावरुन घसरत येणारी मुलं माझ्या मदतीने पुन्हा वर झेपावतात. हो ना?''

घसरगुंडी प्रेमाने हसत म्हणाली,''म्हणून तर प्रत्येक बागेत तू आणि मी बाजूबाजूलाच असतो! कुठल्याही बागेत फक्त तू किंवा फक्त मी नव्हे, तर आपण दोघे एकत्र असतो! मुलांसाठी ही आपली जोडी अभेद्य आहे!!

''घसरण्याच्या साहसातूनच ऊंच जाण्याचा ध्यास रुजतो, ही चिनी म्हण बहुधा तुमच्यावरुनच आली असेल असं वाटतंय मला'' असं चक्र गरगरत म्हणालं तेव्हा बागेतली सगळी झाडं सळसळून हसली. त्यांनी फांद्या हलवत टाळ्या वाजवल्या तेव्हा झोपाळ्यावर आणि घसरगुंडीवर फुलांचा पाऊस पडला.

■■

# जोडी

राजीव तांबे



मागच्या दोन पायांवर उभं राहात मुंगीने मुलांना जोरात हाक मारली. आईची हाक ऐकताच मंगू आणि मुंगू तुरुतुरू धावतच आले. मुंगी आई म्हणाली,''बाळांनो भिंतीच्या कडेकडेने चालायचं बरं. ह्या घरातल्या माणसांना आपल्या शरीरापेक्षा मोठ्ठे डोळे आहेत! तरीपण त्यांना जमिनीवरचं नीट दिसत नाही. चालताना ते धडपडणार आणि आपलं कंबरडं मोडणार! ते चालता-चालता मध्येच बसणार....आणि आपली डोकी फुटणार!!''

तिसऱ्या पायाने डोकं खाजवत मुंगूने विचारलं,''डोळे असून दिसत नाही, हे खरं की काय? कमालच आहे ह्या माणसांची! ''

''अगं म्हणून तर, ह्या घरातले ते काका काकू डोळ्यावर चष्मे लावतात.एव्हढं पण तुला माहित नै?'' मंगू ऐटित म्हणाला.

आई त्यांना समजावत म्हणाली,''भांडू नका रे. आता थोड्याच वेळात सई लाडू खायला बसेल. तिच्या आजूबाजूला राहा. ती खाते कमी आणि सांडते जास्ती!''

''व्वा! म्हणजे माझ्यासाठी मेजवानीच की!!'' मंगू चार पाय नाचवत म्हणाला.

''नाही!नाही!! सांडलेलं गोळा करायचं. आपल्या घरी घेऊन जायचं. सगळ्यांनी मिळून खायचं!!'' मुंगू आईच्या बाजूला सरकत म्हणाली.

मुंगूला थोपटत आई म्हणाली, ''बरोबर आहे रे तिचं. अरे मंगू,लोकांच्या घरी जाऊन खायला आपण का माणसं आहोत?

शहाण्या मुंग्यासारखं वागायचं.आपण आपल्याच घरी खायचं!! ''

हसत-हसत मंगू म्हणाला,''अगं आई मी जरा गंमत केली ग. मला का माहित नै?''

इतक्यात...



# मंगू आणि मुंगू

राजीव तांबे

धपधप धपाधप, धपधप धपाधप असा आवाज ऐकू येऊ लागला. मंगू आणि मुंगू कोपऱ्यात सरकले. आई पटकन भिंतीवर चढली. हातात लाडू घेऊन सई धावत-धावत आली. तिथेच जमिनीवर बसली. लाडू खाऊ लागली. मंगू आणि मुंगू सावध झाले. लाडू कधी सांडतो इथे लक्ष ठेवले.

पण आज चमत्कारच झाला!

मंगू आणि मुंगू अजिबात न सांडता सई लाडू खाऊ लागली. मंगू आणि मुंगू बेचैन झाली!!

मंगू मुंगूच्या कानात हळूच म्हणाला, ''हे काय? तिने जर काही सांडलंच नाही, तर आपण काय जेवायचंच नाही?''

मुंगू त्याला समजावत म्हणाली, ''अरे मुंगूल्या, म्हणून तर आपण आपल्या घरात, भरपूर गोड-गोड गोष्टी साठवून ठेवल्यात ना! तू अजिबात काळजी करू नकोस.''

इतक्यात आई भिंतीवरून तुरतूरत आली, म्हणाली, ''चला लवकर स्वयंपाकघरात. तिकडे सईच्या आईने लाडू बशीत ठेवलाय. आणि ती आरामात बसली आहे टीव्ही पाहात. आता अख्खी सिरीयल संपेपर्यंत ती काही उठणार नाही. तोपर्यंत तो लाडू आपलाच!!''

मंगू आणि मुंगू आनंदाने किंचाळत सुसाट धावतच निघाले. भिंतीवरून आई ओरडली, ''अरे बाळांनो जरा शिस्तीत चला. रांगेत चला. गडबड करायला, ही काय शाळेची मधली सुट्टी आहे का? केव्हढा हा दंगा!''

भिंतीवरून धावत मंगू आणि मुंगू स्वयंपाकघरात पोहोचले.

त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला!

बशीत लाडूच नव्हता!!

त्यांना कळेचना असं कसं झालं?

आता काय करावं?

आता काय खावं?

की उपाशी बसावं?

इतक्यात मागून मुंगी मावशी आली. म्हणाली, ''बावळटा सारखी ती रिकामी बशी काय पाहताय? चला-चला. आपणहून काम करा. बशीच्या भोवतालचा वास घ्या.

मिशा हलवा.

आपली बहीण भावंडं कुठे-कुठे आहेत ते शोधून काढा. त्यांना मदत करा.

आम्ही सर्वांनी मिळून लाडूचे बारीक-बारीक तुकडे करुन ठेवलेत. ते घ्या आणि पळत सुटा! चांगल्या कामाला ऊशीर नको.''

मुंगू, मंगू पळाले. लाडू घेऊन निघाले. रांगेत चालू लागले.

■■



# हातगाडी

अवधूत डोंगरे

आमच्या शाळेच्या मागच्या गेटातून बाहेर पडल्यावर लगेचच डावीकडे एक रस्ता जातो. त्या रस्त्याने पुढे गेलं की ते माझ्या नावाचं दुकान लागतं. अनंत स्टोअर्स. तिथे ती आईस्क्रीमची कांडी मिळते एक रुपयाची. मी कधी कधी ती कांडी विकत घेतो.

तिथून पुढे गेलं, की 'दळी फर्निचर वर्क्स' नावाची लाकडाची वखार लागते. त्या वखारीत बरेच लोक काय काय करत असतात. वखारीला तीन बाजूंनी मोठमोठाले पत्रे लावलेले आहेत. ते का लावलेत, ते काही मला कळलेलं नाही; आणि तिथे आता एका बाजूला खूपच मोठ्या आकाराचे ओंडके ठेवलेत. एकदा मी एका ओंडक्याजवळ उभा होतो. तो ओंडका जवळजवळ माझ्याएवढाच उंच होता. तर अशा त्या ओंडक्यांच्या इथे बसायला मस्त जागा तयार झालीय, छोट्या-मोठ्या ओंडक्यांची मिळून. बाजूच्या बदामाच्या झाडाची थंड सावली त्या ओंडक्यांवर पडलेली असते. त्या सावलीबरोबरच बदामाच्या झाडाची मोठीमोठी पानं, हिरवे बदाम हेसुद्धा तिथे पडलेले असतात.

तर अशा त्या दुकानातून आईस्क्रीमची कांडी घेऊन ओंडक्यांच्या इथे येऊन मी खात बसतो. मी जेव्हा जेव्हा तिथे बसतो तेव्हा मला तिथे तो म्हातारा हातगाडीवाला दिसतो. तो हातगाडीवाला नेहमी पांढरा लेंगा, पांढरा झब्बा आणि पांढरी टोपी ह्याच कपड्यांमध्ये असतो आणि त्या पांढऱ्या कपड्यांना मातीने लाल रंग दिलेला असतो.

कधीकधी तो म्हातारा हातगाडी ढकलत तिथे आला, की त्या हातगाडीवरच आडवा होतो आणि जोरजोरात खोकत राहतो. म्हाताऱ्याचं खोकणं संपायच्या आत माझं आईस्क्रीम संपतं आणि मी घरी जातो, असं बऱ्याच वेळा होतं. एकदा तो म्हातारा तिथे नसताना आईस्क्रीमने चिकट झालेल्या हातांनी ती हातगाडी ढकलायचा प्रयत्न मी केला होता; पण खूप जोर लावला तरी ती हातगाडी काही जागची हलली नाही. तो म्हातारा ती कशी काय ढकलू शकतो, हे काही

मला कळेना.

असाच मी एकदा कांडी घेऊन आलो आणि ओंडक्यांवर बसायची तयारी करायला लागलो, तेवढ्यात हे म्हातारेबुवा आले हातगाडी घेऊन. आज ते खूपच हळू गाडी ढकलत होते आणि त्यांना घामसुद्धा जरा जास्त आलेला दिसत होता. पत्र्याच्या बाजूने ते गाडी वळवण्याचा प्रयत्न करीत होते. मी त्यांच्याकडेच बघत होतो तर ते एकदम डावीकडे कलंडले पत्र्यावर, आणि खाली पडले, मग स्वत:हून उठले. त्यांच्या डाव्या हाताला पत्रा लागून जखम झाली होती आणि तिथून रक्त यायला सुरुवात झाली होती.

माझं आईस्क्रीम वितळायला लागलं आणि त्याचा रस खाली सांडत होता, पण मला आता ते खायचाच कमालीचा कंटाळा आला. ते जड ओंडके, ती जड हातगाडी, असं सगळं जड जड वाटायला लागलं. मी आईस्क्रीमची कांडी घेऊन त्या हातगाडीवाल्याजवळ गेलो आणि म्हटलं, ''आजोबा, हे घ्या तुम्हांला आईस्क्रीम'' तो हातगाडीवर बसून हातावरची जखम एका कापडाने पुसत होता. मी आईस्क्रीमची कांडी पुढे केल्यावर त्याने थोडा वेळ माझ्याकडे बघीतलं. मग माझ्या हातातून ती कांडी घेतली आणि हसत माझ्या पाठीवर दोनदा थोपटलं. मला एकदम बदामाच्या झाडाच्या सावलीसारखं थंड वाटलं.

आता आईस्क्रीमचा रस हातगाडीवाल्याच्या लेंग्यावर सांडत होता... पण मला उगाचंच हातगाडी हलकी झाल्यासारखं वाटायला लागलं.

■■

**अवधूत डोंगरे**
संज्ञापन व वृत्तविद्या विभाग, पुणे विद्यापीठ,
रानडे इन्स्टिट्यूट इमारत, पुणे ४. मोबा. 9421229251



# शरदचा मामा

विवेक राजेंद्र मुंबरकर

या वर्षी शरद मामाच्या गावाला गेला नाही. कुठे गार्डनमध्ये गेला; मित्रांबरोबर ट्रेकिंगला गेला, तरी तो सारखा उदास वाटत होता. कारण त्याला मामाचे गाव, मामाचे शेत, शेतामधील पाटाचे पाणी, केळीची बाग यांबरोबर निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज, 'चंद्रा' गायीचा पाडा 'सूर्या', या सगळ्यांची आठवण येत होती.

पण शरद मामाच्या गावाला का गेला नाही?

त्याला ते दिवस आठवले... मामा दिवाळीत शरदला व त्याच्या आईला भेटायला आला. शरदच्या आईकडून काही आर्थिक मदत होईल का, या आशेने. त्याचे सर्व व्यवस्थित झाल्यावर पैसे परत करण्याच्या बोलीवर शरदच्या आईने त्याला पैशाची मदत केली. मामा खूष होऊन परत गेला. त्या पैशातून त्याने शेतात पाण्याचा पंप मारून पाण्याची सोय केली. दोन-तीन वर्षांतच भर उन्हाळ्यातही हिरवेगार दिसू लागले. जवळपास कुठेच पाण्याची सोय नसल्याने सर्व पक्षी, गुरे पाणी पिण्यासाठी तिथे येऊ लागले.

मामाकडे शेतीबरोबरच गाई, म्हशी, बैल अशी जनावरे होती. पहिल्या वर्षी मामाने भुईमुगाची लागवड केली. चांगले उत्पादन झाले. खर्च वजा जाऊन थोडा फायदाही झाला. मामा-मामी,आजी-आजोबा सर्वजण आनंदी झाले. मामाने शरदच्या आईचे पैसे परत केले. शरदला आता मामाकडे जाण्यास मजा वाटू लागली. म्हणून सुट्टी कधी लागते आणि कधी एकदा मामाच्या गावाला जातो, असे त्याला होत असे.

आजीच्या हातची गरमागरम भाकरी, सोबत शेंगदाण्याची चटणी, शेतातल्याच वांग्याचे भरीत-डाळपालक असे खाणे; आणि दिवसभर शेतातून हुंदडणे. आंब्याच्या झाडावर चढणे, गुरांच्या पाठीमागे जाणे, मोर पाणी पिण्यासाठी आले तर त्यांची पिसे गळतील म्हणून त्यांच्यामागे धावणे आणि उरलेल्या वेळात पाटाच्या पाण्यात नाचत राहणे, असे त्याचे सुट्टीचे दिवस जात.

असाच त्याही वर्षी तो सुट्टी लागल्याबरोबर मामाकडे गेला. मामाने शेतात भुईमूग व केळी लावली होती. शेंग तयार होत आली. नगदी पीक म्हणून शेंग जरा जास्तच लावली होती. पाण्याच्या ओलाव्यामुळे शेताच्या धुऱ्याने हिरवळ चांगलीच झाली होती. पण भारनियमनामुळे दिवसभर लाईट नसायची. संध्याकाळी सहा वाजता लाईट यायची. त्या दिवशीही अशीच सहा वाचता लाईट आली आणि मामाने मोटर चालू केली. शरद पंपाखाली बसून पाण्यात खेळत होता. मामा गोऱ्या



व मोऱ्याला (त्याच्या बैलांना) शेताच्या धुऱ्याने चारवत होता. शेंगांच्या वेलांना तोंड लावू नये म्हणून बैलांसोबत होता. 'बैलांना चारवून शेताला पाणी देण्यास सुरुवात करू या,' या विचारात मामा बैल चारवत होता. कारण रात्रभर शेतीला पाणी देण्याचे काम करायचे होते. इतक्यात गोऱ्या बैलाने मामाला ढुसणी मारून खाली पाडले आणि त्याच्या छातीवर पाय देऊन शिंगांनी ढुसण्या देऊ लागला. मामाच्या ओरडण्याचा आवाज ऐकून शरदही ओरडू लागला, ''मामाला वाचवा, मामाला वाचवा''. आजी आजोबाही ओरडू लागले. तेव्हा आजूबाजूच्या शेतातील लोक धावून आले. त्यांनी मामाला बैलाच्या तावडीतून सोडवले. मामाला जखम झाली होती; पण मामा थोडक्यात वाचला म्हणून सर्वजण समाधान व्यक्त करीत होते. आजही हा प्रसंग



आठवला तर शरदच्या अंगावर काटा उभा राहतो.

त्यानंतर भारनियमनामुळे शरदचा मामा रात्र-रात्र जागून शेताला पाणी देत असे. थोड्याच दिवसांत शेंगा काढणी सुरू झाली. सर्वजण कामाला लागले. आजी-आजोबा, मामा-मामी त्यांची मुले व शरद सर्वजण दिवसरात्र एक करून शेंगा काढून शेतातच वाळण्यासाठी पसरवू लागले. बघता बघता शेंगा काढून झाल्या. याही वर्षी मामाच्या मेहनतीचे फळ म्हणून भरपूर शेंगा तयार झाल्या. 'उद्या दिवसभर शेंगांची पोती भरू आणि रात्री ट्रक येईल, मग बाजारात पाठवून देऊ'' या विचारात मामा होता.

गाय हंबरत होती, वासरूही गायीकडे धाव घेण्यासाठी धडपडू लागले. म्हशीचे रेडकूही ओरडू लागले. आजी म्हशीजवळ दुधाची चरवी घेऊन गेली. गुडघ्यात चरवी धरून म्हशीच्या धारा काढू लागली. चुळूक-चुळूक असा धारेचा आवाज येऊ लागला. मामाही, गायीला पान्हा फुटेपर्यंत वासराला पाजून चरवी घेऊन गायीचे दूध काढू लागला. ते दृश्य फारच मनोहर होते. वासराचे हंबरणे, बैलांच्या गळ्यातील घुंगरांचा आवाज, मोरांचे केंकारणे, धारेचा चुळूक चुळूक असा आवाज, या सर्व आल्हाददायक वातावरणाचा आस्वाद शरद घेत होता. धार काढून झाल्यावर मामीच्या हातांत चरवी देऊन मामाने वासराला पाणी पिण्यासाठी सोडले आणि मग आकाशाकडे बघत खाटल्यावर पडला. मामीने भरल्या वांग्याचे भरीत केले होते. मामा, आजोबा, शरद, मामाची मुले, सर्वजण जेवायला बसले. भाजीचा घमघमाट सुटला होता. आजी चुलीवर भाकरी करीत होती. भारनियमनामुळे शेतातल्या शेतातच रात्रीची कामे करता यावीत म्हणून शेतात एक खोपटं बांधून सर्वजण राहत होते.

मामीने सर्वांना जेवण वाढले. भाकरीचा तुकडा मोडून तोंडात टाकणार, तेवढ्यात मामाचे लक्ष आकाशाकडे गेले. पाहतो तर काय? आकाशात काळे ढग दिसू लागले होते. तसेच्या तसे सर्वजण जेवणावरून उठले आणि शेंगा गोळा करू लागले. आभाळ आणखीनच दाटून आले. विजाही चमकू लागल्या. त्याबरोबर मामा आजोबांना म्हणाला, 'तुम्ही शरद व मुलांना घेऊन शेजारच्या शेतातील दुसऱ्यांच्या मजबूत असलेल्या खोपटात जा.' आजोबा शरदला आणि मामाच्या मुलांना फरफटत नेत असतानाच पाऊस सुरू झाला. आजोबा सर्वांना घेऊन कसेबसे खोपटात पोहोचले. शरद आणि मामाची मुले कुडकुडतच खोपटातल्या खाटेवर पडली.

सकाळी उठल्यावर शरदला दिसले, की रात्रभर पडलेल्या मुसळधार पावसाने भुईमूग रानोमाळ झाले होते. अथक प्रयत्न करूनही मामाला शेंग गोळा करता आली नाही. शरदने खोपटाबाहेर पाय ठेवला तोच त्याचा पाय गुडघाभर चिखलात रूतला. तरीपण कसाबसा तो मामाकडे गेला. मामाने जिथे शेंग पसरली होती, तिथे एकही शेंग उरली नव्हती. केळीची झाडेही उन्मळून पडली होती. शरदने आजूबाजूला पाहिले आणि पाहतो तर काय? रात्री जेवायला घेतलेली पाने, त्यावरील भाजी, भाकरी सगळे अस्ताव्यस्त पडले होते. ते सर्व दारुण दृश्य पाहून शरदला वाटले, 'निसर्ग कोपला तर हातातोंडाशी आलेला घास काढून घेतो.' निसर्गाच्या कोपाबद्दल तो ऐकून होता, भूकंप, दुष्काळ, त्सुनामी, अवकाळी पाऊस असे एक ना अनेक. पण निसर्गाचा असा कोप मात्र त्याने पहिल्यांदाच अनुभवला होता.

त्यानंतर मामाला जगणे नकोसे वाटू लागले. इतके कष्ट करूनही निसर्ग साथ देत नाही, सुखाचे दिवस टिकू देत नाही, मग जगण्यात अर्थ तरी काय? मामाच्या मनात आत्महत्येचेही विचार येऊ लागले. पण मामी चांगली होती. तिने मामाची समजूत काढली. ती म्हणाली, 'शेती करताना कधी कधी निसर्ग आपल्याला दगा देणारच; त्यापेक्षा आपण शहरात जाऊन काहीतरी कामधंदा करू'. आणि मग मामा आपल्या शेतीला रामराम ठोकून शहरात मोलमजुरी करून राहू लागला. त्यामुळे शरदला आता मामाच्या गावाला जाता येत नाही...

■■

**विवेक राजेंद्र मुंबरकर**
कणकवली, जि. सिंधुदुर्ग ४१६६०२ फोन : 02367-22607

# आम्हाला पण शिकायचं आहे

कमल राजाज्ञा

विकासनगरहून बाभूळगावला जाणाऱ्या जीपमध्ये प्रशांत बसला. दुतर्फा झाडी असलेला डोंगरातला वळणावळणांचा रस्ता कापून, नंतर खडकाळ माळ ओलांडून जीप एका मोकळ्या जागेत येऊन थांबली. कडेला चारपाच दुकानं आणि झाडांच्या सावलीत प्रवाशांसाठी एक बाकडं होतं. बाकावरच्या लोकांनी जीपकडं धाव घेतली. प्रशांत जीपमधून उतरला.

''तांदूळवाडीला कसं जायचं?''

त्यानं एका दुकानात विचारलं.

''एकच सरळसोट वाट आहे. ती बघा माणसं चाललीत.'' दुकानदार बोट दाखवत म्हणाला. ती माणसं तर चक्क शेतातून चालली होती.

डोंगर-उतारावरील नांगरलेल्या शेतांच्या बांधावरून चढत प्रशांतही त्या माणसांच्या मागं चालला. डोक्यावर गाठोडी घेऊन ती माणसं एका ओढ्यातून पलीकडे जात होती. एक बॅग पाठीला, एक बॅग खांद्यावर अडकवून प्रशांतनेही ओढा पार केला. कधी चढ, कधी उतार, कधी वळणं घेत वाट चाललीच होती. प्रशांत मेटाकुटीला आला.



जून महिना सुरू झाला होता, तरी आकाशात एकही ढग नव्हता. समोर आणखी एक ओढा लागला. त्याच्या पलीकडं गर्द झाडीनं भरलेला डोंगर दिसत होता. वर गुरा-माणसांच्या येण्याजाण्याने लहानमोठ्या वेड्यावाकड्या पायऱ्यांची पायवाट झालेली होती. दोन्ही बाजूला कोरड्या पडलेल्या झऱ्यांच्या नागमोडी खुणा दिसत होत्या. 'पावसाळ्यात वाट चांगलीच निसरडी होत असणार...' प्रशांतच्या मनात विचार आला. ओल्या हवेत जंगलात भरमसाठ जळवा होतात, हेही त्यानं ऐकलं होतं.

अचानक जंगल संपलं. समोर खडकाळ रखरखीत पठाराचा पट्टा होता. त्याच्या पलीकडे कौलारू छपरं दिसत होती. तीच तांदूळवाडी. तिच्या आणि बाभुळगावच्या मधलं घनदाट जंगल सहा किलोमीटरचं होतं. जंगलात अत्यंत दुर्मिळ, औषधी वनस्पती आणि सागवानासारखी मौल्यवान झाडं होती. त्यांची चोरी होऊ नये म्हणून शासनानं गाडीरस्ता केलाच नव्हता. बिचारी तांदूळवाडी एखाद्या बेटासारखी एकाकी पडली होती. कापडाचोपडापासून काड्याच्या पेटीपर्यंत एकूणएक वस्तू बाभूळगावच्या बाजारातून आणाव्या लागत. टीव्ही, सिनेमा, फोन, दवाखाना काही म्हणता काही नव्हतं तिथं. नाही म्हणायला शासनानं गावात विजेची सोय केलेली होती. एक शाळाही होती. त्या शाळेतच प्रशांतची शिक्षक म्हणून नेमणूक झाली होती.

तांदूळवाडीसारख्या एकलकोंड्या खेड्यापाड्यांत मास्तरकी करून आलेल्या चारपाच जणांनी त्याला सल्ला दिला होता...

''तिथं ना फोन ना पोस्ट. एकदा सुट्टीवर गेल्यावर परत हजर झालात का नाही, हे बघायला कोण आहे? असल्या ठिकाणी पायपीट करून शाळा तपासायला तरी कोण येतंय? आणि खरं म्हणजे शिकायला तरी कोण येतंय? घरची, शेताची कामं करण्यातच दिवस जातो पोरांचा. कसेतरी चारसहा महिने काढायचे आणि घ्यायची बदली करून.''

प्रशांत अतिशय हुशार, अभ्यासू होता. दहावीपासून एम.ए.पर्यंत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत आला होता. डी.एड.ला जिल्ह्यात दुसरा आला होता. म्हणूनच असल्या दुर्गम गावंढ्यात आपली बदली व्हावी, याचा त्याला फार राग येत होता. आपल्यावर अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जळफळत होता तो. त्याचे वडील त्याच्या बदलीसाठी प्रयत्न करीत होते.

प्रशांतला तांदूळवाडीला येऊन चार दिवस झाले. साठ-पासष्ठ कौलारू घरं, प्रत्येक घराभोवती सारवलेलं अंगण आणि फुलझाडं होती. भोवताली नांगरलेली शेतं, आंबा, जांभळाची झाडं पसरलेली होती. गावात एक देऊळ, एक विहीर आणि एक शाळा होती. शाळेला लागून असलेलं दोन खोल्यांचं घर प्रशांतला मिळालं होतं.

शाळा स्वच्छ, नीटनेटकी होती. भिंतीवर नकाशे, इतिहास, भूगोल, शास्त्र वगैरेंचे माहितीप्रद तक्ते होते. शाळेत बत्तीस मुलं होतं. बहुतेक सगळी वेळेवर हजर असायची. मुलं चुणचुणीत, जिज्ञासू व शिकायला उत्सुक होती. प्रशांतला प्रश्न विचारून भंडावून सोडायची. प्रशांतच्या विनोदावर मनापासून हसायची. शाळा सुटल्यावर प्रशांतही मुलांत मिसळून क्रिकेट, फुटबॉल खेळायचा, पतंग उडवायचा.

तांदूळवाडीतून शक्य तितक्या लवकर पळ काढायचा; पण तिथं असेपर्यंत मन लावून शिकवायचं असं त्यानं ठरवलं होतं. मुलंही शिकायला तयार असत.

''वर्षातनं चार महिनंच मास्तर असतो, आमच्या गावाला. त्यामुळं मुलंपण मिळेल तेवढं शिकून घेतात. आमी पण काम देत न्हाई त्यांना.'' गावातल्या एकानं त्याला सांगितलं होतं. पठारावर आजूबाजूला अजून अशा सहा वाड्या होत्या. तिथंही हीच परिस्थिती होती.

किशोर, सदानंद आणि श्रीधर यंदा सातवीला होते. मुलं हुशार होती; पण त्यांचा अभ्यास बराच मागं पडला होता. शाळा सुटल्यावरही थांबून तो पुरा करायला ते धडपडत. इतके दिवस थांबलेला पाऊस अचानक आला. दोन दिवस सतत कोसळला. रविवारी सकाळीच किशोर, सदानंद आणि श्रीधर गुरुजींच्या घरी आले.

''गुरुजी, आज बाभुळगावचा बाजार. तुमचं काय सामान आणायचं असलं तर आणून देतो आम्ही.''

किशोर म्हणाला. प्रशांतकडं आणखी सहा-सात दिवस पुरेल एवढी पीठं, डाळी, तांदूळ होते. त्यानंतर खाली जाऊन महिनाभराची बेगमी करून ठेवावी, असं त्यानं ठरवलं होतं.

तेवढ्यात सदा म्हणाला,

''रविवारी भाज्यासुद्धा चांगल्या मिळतात, इथं न होणाऱ्या.''

''शिवाय पेरण्या सुरू झाल्यावर आम्हांला जायला जमणार नाही. आजच आणून टाकतो.'' श्रीधर म्हणाला.

आज चांगली उघडीप होती. पुढं पावसाचाही भरंवसा नव्हता. सामान घेऊन डोंगर चढणं प्रशांतसाठी भयंकर दिव्य होतं. मुलांना सवय आहे, असा विचार करून प्रशांतनं मुलांना सामानाची यादी व पैसे दिले.



दिवसभर आकाश ढगांनी भरलेलंच होतं. दुपारी तीन वाजता, डोक्यावर बोचकी घेऊन ती तिन्ही मुलं आली.

''वेळ लागला रे?'' त्यांच्या डोक्यावरची प्लॅस्टिकच्या पोत्यांची बोचकी उतरवून घेत प्रशांतनं विचारलं.

''डोंगरात पाय घसरत होते सारखे-'' किशोर म्हणाला.

ते ऐकून प्रशांतचं लक्ष सहजच त्यांच्या पायाकडं गेलं.

''अरे, हे रे काय?'' तो ओरडलाच.

मुलांच्या मांड्या, पिंढऱ्या, पावलं रक्ताच्या लहान-मोठ्या ओहोळांनी भरली होती.

''काही नाही गुरुजी. पाऊस झाला ना! जंगलात जळवा झाल्यात.'' किशोर म्हणाला.

''अरे, पण इतकं रक्त...'' प्रशांतला बोलवेचना.

''जरा ओल आली की सुळसुळाट होतो नुसता. पावला पावलाला चढत असतात.'' श्रीधर म्हणाला.

मुलांनी अर्ध्या चड्ड्या अन् पायात चपला घातल्या होत्या. वर डोक्यावर ओझं. जळवा झटकाव्यात, त्यावर मीठ टाकावं म्हटलं तर हात मोकळे कुठं होते?

''माझ्या लक्षातच आलं नाही रे; नाहीतर मी जाऊ दिलंच नसतं तुम्हांला.'' प्रशांत कळवळून म्हणाला.

''आम्हांला काही पण वाटत नाही त्याचं गुरुजी. आम्ही आणून देत जाऊ तुमचं सामान.'' किशोर म्हणाला.

''पण तुम्ही वाडी सोडून जाऊ नका, गुरुजी.'' श्रीधर म्हणाला.

''नाही ना जाणार, गुरुजी, आम्हांला सोडून?'' सदाने काकुळतीला येऊन विचारलं. तिघांचे आशेने भरलेले डोळे प्रशांतकडे लागले होते.

■■

**कमल राजाज्ञा**

'केदार', सर्व्हे क्र. १९/१ ब, निर्झर सोसायटी,
कोथरूड, पुणे ४११०२९ दूरध्वनी : (020)25441828

४६ वर्षांपूर्वी म्हणजे १९६२ साली घडलेली गोष्ट.त्यावेळी शिक्षकांसाठी ज्युनिअर, सीनियर अशा परीक्षा होत्या. शिक्षणशास्त्र व मानसशास्त्र या विषयांबरोबरच शाळेत शिकवले जाणारे सर्व विषय अध्ययनासाठी होते. कला, क्रीडा, गायन या विषयांचेही अध्ययन-अध्यापन करावे लागे.

सर्व विषयांचे घटक शिकवावे लागत; त्यांचे प्रात्यक्षिक पाठ घ्यावे लागत. काही पाठ स्वत: घ्यायचे, काहींचे निरीक्षण करायचे. त्यातही वार्षिक पाठ अतिशय महत्त्वाचा आणि शिक्षकांच्या नजरेतून पहायचे तर गुणांची सरासरी वाढवणारा.

पाठासाठी आपल्या आवडीचा विषय मिळणं म्हणजे लॉटरीच लागणं! माझ्या बाबतीत तसंच झालं. मराठी हा माझ्या आवडीचा विषय, त्यात 'पद्य' म्हणजे तर दुधात साखर!

माझ्या पाठाचा घटक होता...

'सदैव सैनिका पुढेच जायचे ।
न मागुति तुवा कधी फिरायचे ।'

ही कविवर्य वसंत बापट यांची कविता. पायात घुंगरांचा तालच घेऊन येणारी.

## प्रेरणा

पुष्पप्रभा प्रभाकर बोकील



मी केलेल्या प्रस्तावनेनेच वर्ग आनंदाने बहरून आला. हेतु कथन फळ्यावर लिहून झाले. अन्वयार्थाने कविता वाचून होताच, वर्गामध्ये चैतन्य निर्माण झाले. रसपरिपोष अतिशय चांगला झाला. मुले खूष झाली. परीक्षकही खूष दिसत होते.

'मुलांनो! आता आपण कवितागायन करू... मी अगोदर म्हणते... तुम्ही माझ्या पाठीमागून म्हणा... कवितेला अतिशय सुंदर चाल आहे. तालही चांगला आहे. उभे राहून म्हटली तर फारच चांगले वाटेल. मी 'एक-दोन' म्हणताच तुम्ही उभे रहायचे.

चला! एक-दोन...

सर्व मुले उभी राहिली, पण मागे एक मुलगा बसूनच होता. मी थोडी अस्वस्थ झाले. नकळत माझा आवाज चढला. 'काय रे, तुला ऐकू येत नाही का?'

बाकीची सर्व मुले शांत होती.

एखाद्या मुलाला बाई रागावल्या तर फिदीफिदी हसणारी मुले शांत कशी, हा विचार मनात डोकावला. पण थांबायला वेळ नव्हता. घड्याळाचा काटा पुढे सरकत होता. पाठ वेळेत आवरणे महत्त्वाचे होते.

कविता म्हणायला सुरुवात केली. मुलेही छान साथ देत होती. पाठ अतिशय चांगला झाला. परीक्षकांनी मनापासून शाबासकी दिली.

जागेवरून न उठणाऱ्या त्या मुलाबद्दल माझ्या मनात थोडा रागच होता; कारण त्याच्यामुळेच माझा आवाज चढला होता. त्याला जाब विचारावा या विचाराने मी पुढे झाले. तेवढ्यातच शाळा सुटल्याची घंटा झाली. सगळी मुले दप्तर घेऊन ओळीत उभी राहिली. शिस्तीने एकेक करून वर्गाच्या बाहेर पडली.

पण तो मुलगा मात्र दाराकडे पहात बसूनच होता. तेवढ्यात त्याची आई आली. त्याला उचलून कडेवर घेऊ लागली. माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. 'अरे! याचे पायच अधू आहेत तर!'

माझ्या बोलण्याचे मलाच वाईट वाटले, म्हणून त्याच्याजवळ गेले. त्याच्या पाठीवरून हात फिरवत म्हणाले, 'ती तुला मघाशी विनाकारण बोलले'.

तो म्हणाला, 'तुम्ही नका वाईट वाटून घेऊ, बाई! तुम्हांला कुठे माहिती होते, मला उठता येत नाही ते! आणि तुम्ही शिकवलेली कविता मला खूपच आवडली. जागेवर उभा नाही राहिलो, तरी मी हाताने ठेका धरला होता.'

'तुमचा मुलगा हुशार आहे हो! छान प्रगती करील...' मी त्याच्या आईला म्हणाले.

ती म्हणाली, 'तीन-चार वर्षांचा होता तेव्हा ताप आल्याचे निमित्त झाले आणि त्याच्या पायातून वारे गेले. खूप डॉक्टर, दवाखाने केले. मायेपोटी कुणी काही सांगितले, तेही केले. पण कशाचाच उपयोग झाला नाही. शेवटी ईश्वराची इच्छा म्हणायची, दुसरे काय?'

हे ऐकून तो पटकन म्हणाला, 'आई, तू अशी निराशेने बोलू नकोस. माझे पाय काम करीत नाहीत, पण मी डोळ्यांनी पाहू शकतो, कानांनी ऐकू शकतो, तोंडाने बोलू शकतो, हाताने लिहू शकतो...'

आताच बाईंनी शिकविलेल्या कवितेचा अर्थ मी नुसता ऐकून सोडून देणार नाही. मी माझ्या वागण्यात तो आणणार आहे. मी खचून जाणार नाही.

*'सदा तुझ्यापुढे उभी असे निशा।*
*सदैव काजळी दिसायच्या दिशा।*
*दहा दिशातुनी तुफान व्हायचे।*
*सदैव सैनिका पुढेच जायचे।'*

या ओळींप्रमाणे मी पुढेच जात राहणार. कितीही अडचणी आल्या तरी मागे नाही फिरणार!

मुलाचे हे बोलणे ऐकून त्याच्या आईचा कंठ दाटून आला. त्याला पोटाशी धरत ती म्हणाली, 'बाई, तुम्ही काय जादू केलीत! माझा मुलगा एकदम मोठ्या माणसासारखे बोलतोय! मी फक्त त्याच्या पायाच्या अधूपणात अडकले होते.

'जादू मी नाही केली. बापटसरांची कविताच इतकी प्रभावी आहे. तिच्या शब्दाशब्दांत 'प्रेरणा'च ओतप्रोत भरलेली आहे. या कवितेने अनेक लोकांना जगण्याची संजीवनी दिली आहे.'

■■

**पुष्पप्रभा प्रभाकर बोकील**
२१९, झाला सोसायटी, कर्वेरोड,
कोथरूड, पुणे ३८. फोन : (020) 25463432

त्या दिवशी मी थोडी जरी कच खाल्ली असती, तरी माझ्या मुलाच्या मनामध्ये चुकीच्या विचाराचं बीज पेरलं गेलं असतं आणि त्याला कारणीभूत झाला असता, किराणा मालाचा दुकानदार व्यापारीच म्हणाना...

आम्ही राहतो ते गाव बऱ्यापैकी मोठं होतं. गावातून राष्ट्रीय महामार्ग जातो; त्यामुळे गावात सगळ्या प्रकारच्या सुधारणांचं वारं आलं आहे. गावात मोठमोठी दुकानं आहेत, चारपाच मजली इमारती उभ्या राहिल्या आहेत. अशा इमारतींनी एसटी स्टँडचा परिसर गजबजून गेला आहे.

अशाच एका चार मजली इमारतीच्या तळमजल्यावर- क्रांती चौकात- त्या व्यापाऱ्याचं किराणा मालाचं दुकान आहे. मी माझ्या मुलाला चारपाच वस्तूंची यादी देऊन किराणा माल आणायला पाठवलं. मुलगा सातवीत शिकत होता; म्हणजे एकटा जाऊन तो साहित्य आणू शकत होता... बरं, किराणा मालाचं साहित्यही फार जास्त नव्हतं. मुलगा गेला. किराणा मालाच्या यादीत एक किलो साखर आणायला सांगितली होती. पण येताना त्याने एकेक किलोचे दोन पुडे आणले, म्हणून मी त्याला विचारलं,

''तू दोन किलो साखर कशी काय आणलीस?''

''दुकानात काम करणाऱ्या मुलानेच दिली.''

''पण तुझ्या लक्षात आलं नाही का? तुला एकच किलो साखर आणायला सांगितली असताना तू दोन किलो कशाला आणलीस? आणि त्याला पैसे किती दिले? पाहू मला यादी...''

मी मुलाकडून यादी घेऊन पाहिली, यादी तपासल्यावर माझ्या लक्षात आलं की, त्यात एक किलो साखरेचेच पैसे घेतले होते. मग मात्र मी मुलावर खवळलो.

''यादीत तर एक किलो साखरेचेच पैसे घेतलेत, मग तू साखरेचे दोन पुडे का आणलेस...''

तसा तो म्हणाला, ''दुकानात साखरेचे पुडे बांधलेले होते, तेथे काम करणाऱ्या मुलाने अर्धा किलोचे दोन पुडे देऊ का, म्हणून मला विचारलं, तर मी त्याला 'हो' म्हणालो.''

म्हणजे अशी गफलत झाली तर!... काम करणाऱ्या त्या मुलाने अर्धा किलोचे दोन पुडे देण्याऐवजी चुकून एकेक किलोचे दोन पुडे दिले होते. यात माझ्या मुलाची काही चूक दिसत नव्हती. काम करणाऱ्या मुलाचीच ही नजरचूक होती.

मग मी माझ्या मुलाला साखरेचा एक पुडा त्या दुकानदाराला परत करायला पाठवलं. तो पळतच दुकानात गेला आणि साखरेचा पुडा परत देऊन आला... परत आल्यावर मला म्हणाला, ''दिला परत पुडा...''

मी समाधानाचा सुस्कारा सोडला. मनात म्हटलं, 'अशाच छोट्या छोट्या प्रसंगांतून मी माझ्या मुलावर संस्कार करू शकतो.'

दुपारी मी तो प्रसंग विसरूनही गेलो. माझा मुलगाही खेळायला निघून गेला. तोसुद्धा हा प्रसंग विसरून गेला असावा.

दुपारनंतर ऊन जरा कमी झालं. वामकुक्षी घेऊन मी उठून बसलो होतो. तेवढ्यात माझ्याकडे कुणीतरी आल्याचं 'सौ'ने सांगितलं. मी त्यांना आत बोलावलं, तर माझ्याच मुलाच्या वयाचा एक मुलगा आणि फाटक्या मळलेल्या कपड्यातला एक माणूस आत आला... मी त्यांना बसायला सांगितलं. 'सौ'ने त्यांना पाणी दिलं...

'काय काम आहे माझ्याकडं?' मी विचारलं.

तर पाण्याचा ग्लास हातात धरून फाटक्या कपड्यातला तो माणूस बोलू लागला.

''साहेब, आम्ही गरीब माणसं आहोत. आमचं हातावरचं पोट आहे. दिवसा जे कमवतो त्याच्यावरच आम्ही आला दिवस ढकलतो... हा माझा मुलगासुद्धा थोडंफार कमवायला मदत करतो. त्याला चौकातल्या किराणा मालाच्या दुकानात दहा रुपये रोजावर कामाला ठेवला होता. आज सकाळी त्याच्या हातून थोडी चूक झाली. तुमच्या मुलाला त्याने चुकून साखरेचा एक पुडा जास्त दिला... तर दुकानदाराने त्याला लगेच कामावरून काढून टाकलं... 'असं काम केलं तर मला दुकान बंद करावं लागंल,' म्हणाला.''

तो माणूस फारच गयावया करीत सांगत होता.

मी विचारलं, ‘‘तुम्हांला माझं घर कसं सापडलं?’’

तर तो मुलगा म्हणाला, ‘‘तुमच्या प्रतिकला मी ओळखतो... तो माझ्याच वर्गात आहे. आज सकाळी मी त्याला अर्धा किलोऐवजी एकेक किलोचे दोन पुडे दिले... मला वजनाचा अंदाज आला नाही, त्यामुळे माझ्याकडून अशी चूक झाली... तुमच्या प्रतिकने जास्तीचा पुडा परत आणून मालकाकडेच दिला... तेव्हा मालकाने मला कामात हलगर्जीपणा केला म्हणून काढून टाकलं.’’

‘‘तुझं नाव काय?’’

‘‘बिटा...’’

मग मी त्याला म्हणालो,

‘‘हे बघ बिटा... तू अजून लहान आहेस. तुझं काम करण्याचं वय नाही. तरीही लक्षात ठेव, येथून पुढे जे काम करशील ते मन लावून करीत जा. आपल्या कामात कोणतीही चूक व्हायला नको...’’

‘‘पण मला त्या दुकानदाराने कामावरून काढून टाकलंय...’’

‘‘चल, आपण त्या दुकानदाराकडे जाऊ. मी समजावून सांगतो त्याला...’’

# त्याला परत कामावर घ्या

साईनाथ पाचारणे



एवढं बोलून मी उठलो... तोंड, हातपाय धुतलं आणि कपडे करून त्यांच्याबरोबर दुकानदाराकडे निघालो. बरोबर माझ्या मुलालाही घेतलं.

आम्ही नेहमी त्याच दुकानातून किराणा घेत असल्यामुळे तो दुकानदार थोडा ओळखीचा होता... आम्ही दुकानात आलो तेव्हा दुकानात फारशी गर्दी नव्हती. दुकानाचा मालक एक पारशी गृहस्थ होता. तो गल्ल्यावर बसून होता.

दुकानाच्या पायऱ्या चढताना त्याने आम्हांला पाहिलं होतं, आत आल्यावर मी आधी त्याला नमस्कार केला. पण तिकडे दुर्लक्ष करीत तो म्हणाला.

''काय हवंय?''

''मालक, हा मुलगा....''

मी बिटाच्या खांद्यावर हात ठेवीत म्हणालो,

''त्याला मी कामावरून काढून टाकलंय.''

''पण त्याची चूक तरी काय होती?''

''ते त्याला विचारा ना... तो जर असं काम करू लागला, तर लवकरच मला माझ्या दुकानाला टाळा ठोकावा लागेल.''

''तो लहान आहे शेठजी अजून, लहान मुलांकडून चूक होते... आपण मोठ्या माणसांनी नाही समजून घ्यायचं तर कोणी घ्यायचं?''

''काय म्हणून त्याला समजावून घ्यायचं? कोण लागतो तो माझा? एक साधा कवडीमोल नोकर. मी त्याचा विचार का करावा?''

शेठजी अतिशय तुच्छ भाषेत म्हणाला. खरं म्हणजे मला त्याच्या तसल्या बोलण्याचा राग आला; पण स्वत:वर संयम ठेवीत मी म्हणालो,

''चिडू नका शेटजी! कबूल आहे, त्याच्याकडून छोटीशी चूक झालीय, पण त्याची एवढी मोठी शिक्षा त्याला देऊ नका.''

''मग काय करू? त्याला परत कामावर ठेवू?'' शेटजी माझ्याकडे चमत्कारिक नजरेने पहात म्हणाले.

मी मात्र शांतपणे त्यांना म्हणालो, ''होय! त्याला परत कामावर ठेवावंच लागेल! त्याच्यासाठी नाही. निदान माझ्या मुलासाठी तरी त्याला परत कामावर ठेवावं लागेल! कारण माझ्या मुलाने प्रामाणिकपणा दाखवला, म्हणूनच तुम्ही त्याला कामावरून काढून टाकलंय. तुम्ही जर त्याला परत कामावर घेतलं नाही, तर माझ्या मुलाला वाईट वाटेल आणि त्याच्या मनात चुकीचा संदेश जाईल. स्वत:च्या प्रामाणिकपणामुळे एखाद्याचं नुकसान होत असेल तर परत तो जीवनात कधीच प्रामाणिकपणा दाखवणार नाही आणि तुमच्या असल्या कृत्यामुळे समाजात एका अप्रमाणिक माणसाची निर्मिती होईल. बिटामुळे तुमचं आज थोडं नुकसान झालं तरी चालेल; पण उद्याचा समाज प्रामाणिक घडवायचा असेल, तर आत्ता तुम्हांला माघार घ्यावीच लागेल. माझ्या मुलामध्ये प्रामाणिकपणाची वाढ करून, त्याच्यात आत्मविश्वास आणायचा असेल आणि त्याला उद्याचा स्वच्छ नागरिक बनवायचा असेल तर तुम्ही बिटाला परत कामावर घ्या...''

त्या शेठजीला मी खरी परिस्थिती सांगितली... माझं बोलणं ऐकून शेठजींनी तोंडाचा 'आ' वासला. बहुधा त्यांनाही माझं बोलणं पटलं असावं. क्षणभर ते माझ्याकडे पहातच राहिले. मग त्यांना काय वाटलं कुणास ठाऊक, बिटाकडे पहात म्हणाले,

''तसं त्याला काढून टाकलं तेव्हा मलाही वाईट वाटलं होतं. फारच गोड छोकरा आहे तो! पण मलाही माझा धंदा पाहिला पाहिजे. मन लावून काम केलं नाही, तर माझा धंदा बसेल ना.''

''आता तो मन लावून काम करील शेठजी.'' मी म्हणालो.

''मग काही हरकत नाही. येऊ दे त्याला उद्यापासून कामावर...''

मग बिटाकडे पहात शेठजी म्हणाले, ''काय रे छोकऱ्या, येणार ना उद्यापासून कामावर?''

बिटा काय बोलणार? त्याचा चेहरा फुलासारखा टवटवीत झालेला मला दिसला.

■■

**साईनाथ पाचारणे**
प्राचार्य, सौ.निर्मलताई थोपटे अध्यापक विद्यालय,
भोर, जि.पुणे. भ्रमणध्वनी : 9326092428

बीड जिल्ह्यातील एका खेड्यात माझे बालपण गेले. शहरांपासून दूर पण खाऊन-पिऊन सुखी असे हे गाव. 'अडबंगनाथ' हे 'ग्रामदैवत' गावकऱ्यांचे श्रद्धास्थान. भंडारा, जत्रा, हरिनाम सप्ताह, महिन्याची एकादशी असे ठरलेले उत्सव, मोठ्या उत्साहाने साजरे केले जायचे. कीर्तनं, प्रवचनं अधूनमधून व्हायचे. हरिपाठ व पारायण तर नित्याचेच. पर्यायाने अनेक बाबा, बुवा, भगत यांचे गावात येणे-जाणे असायचे. गावकरी त्यांचा योग्य आदर-सत्कार करीत. साधू-संतांचे पाय आपल्या घराला लागावेत म्हणून प्रत्येक माणूस धडपड करायचा. बाबा-महाराज, आपल्या घरी जेवायला येणे हा 'पुण्ययोग' समजला जायचा. सर्वांना 'कृतकृत्य' झाल्यासारखे वाटायचे.

माझे आईवडील म्हणावे असे भाविक नव्हते; पण पाखंडीही नव्हते. परंपरेने चालत आलेले 'रितीरिवाज' पुढे नेत होते. आजी मात्र सनातनी देवभक्त. कडकडीत 'उपास' करायची, 'व्रतवैकल्ये' जपायची. पांडुरंग व महादेवावर तिची गाढ श्रद्धा. सर्वच साधू-संतांना ती भजायची. पण 'नारायण महाराज' हे तिच्या विशेष आदराचे स्थान. नारायण महाराजांच्या बालपणीचे अनेक मनोरंजक किस्से, ती आम्हा मुलांना सांगायची. देवादिकांच्या 'अद्‌भुत' गोष्टी सांगून आमची मनं रिझवायची. तिच्या तोंडून अभंग, आरत्या ऐकताना वातावरणात प्रसन्नता शिरकाव करायची. 'शरीर व मन, निर्मळ असले तर देव काही कमी पडू देत नाही.' ही तिची शिकवण सुखावून जायची.

ह्या आजीवर मी तर भलताच खूष होतो. 'माझी आजी सर्वांच्या आजीपेक्षा चांगली आहे' असा दावा करायचो. माझे 'बालमित्र' तो दावा अविरोध मान्य करायचे. पण वर्षातून एक-दोन वेळा मला ह्या आजीचा खूपच राग यायचा.

नारायण महाराजांनी आमचे आमंत्रण स्वीकारलेले असायचे तेव्हा, आम्हा मुलांना नेहमीपेक्षा लवकर उठवले जायचे. आई, आजी भल्या पहाटेच कामाला लागलेल्या असत. शेजारच्या आया-बाया मदतीला येत.

सकाळीच आजीचा आदेश सुटायचा, 'पोरांनो! आपल्याकडे महाराज जेवायला यायचेत. आजच्या दिवस आंघोळीला नदीवर जा!'

नदीवरून आल्याबरोबर कढईभर पोहे आमच्यापुढे मांडून आजी म्हणायची, 'एवढे पटकन् खा आणि खेळायला बाहेर जा. महाराजांचे जेवण होईपर्यंत येऊ नका!'

दोन-अडीच तास खेळून परत घरी आल्यावर आम्ही विचारायचो, 'आजी, जेवायला किती वेळ आहे?'

'आलंयच आवरत, थोड्या वेळाने या. चला पळा!'

आम्ही मुलं निराश होऊन बाहेर जायचो. तासाभराने परत आल्यावर आईकडे जायचो. 'आई खूप भूक लागलीय.'

# प्रसाद

आकाश पांढरे



'थोडा वेळ थांबा. सर्व स्वयंपाक झालाय. 'नैवेद्य' पण दाखवलाय. आता फक्त महाराजांना जेवायला वाढलं की तुमची ताटं करते.' आई समजावणीच्या सुरात बोलायची.

नारायण महाराज व त्यांच्याबरोबरचे लोक लवकर येत नसत. अनेक निरोप जाऊनही त्यांच्या बैठका मोडत नसत. देवदर्शन, मंदिराचे बांधकाम, सप्ताहाची वर्गणी, देवादिकांचे चमत्कार अशा अनेक विषयांवरच्या गप्पा रंगात आलेल्या असत.

बारा-एक वाजले तरी त्यांचा पत्ता नसे. मी तर जाम वैतागून जायचो, शिळ्या भाकरीचे तुकडे, चटणी स्वत:च्या हाताने घेऊन खायला बसायचो. पण आई ते खाऊ देत नसे.

'अरे, थोडे थांब, महाराजांना वाढले की लगेच बस!'

'अगं किती वाट पहायची? ते येतील तेव्हा जेवतील. मला एक चपाती व कुरडई-पापड दे.'

'एवढसंच का? पोटभर खा! पण महाराजांचं जेवण होईपर्यंत उष्टं करू नको.'

'पण आई, कुरडई-पापड आणि चपाती बाजूला घेऊन खाल्ली तर सगळा स्वयंपाक उष्टा कसा होईल?'

'तसं नसतं! अगोदर खाल्लं तर उष्टं होतंच! पण मी म्हणते, थोडा वेळ थांबल्याने काय होईल?'

ह्या संवादानंतर रागारागाने पाय आपटीत मी बाहेर जायचो. नदीवरच्या कातळावर बसून विचार करायचो. 'लहान मुलं म्हणजे देवाघरची फुलं' असं नेहमीच म्हणणारी आई आणि आजी असं का वागतात? स्वतंत्र एका ताटात घेऊन खाल्लं तर सर्व अन्न उष्टे कसे होते?'

दुपारी दोन-अडीच वाजता नारायण महाराज यायचे. सोबत दहा-बारा जणांचा लवाजमा असायचा. महाराजांना भेटायला येणाऱ्यांनाही आग्रहाने जेवू घातले जायचे. ह्या सर्वांची जेवणं संपत तेव्हा दुपारचे तीन-साडेतीन वाजलेले असत.

त्यानंतर माझी शोधाशोध सुरू व्हायची. खूपच अडून बसलो तर आई किंवा आजी यायची, बळेबळेच मला उठवून न्यायची.

'काय बाई, किती उशीर झालाय! पोरांना खूपच भुका लागल्या असतील.' असे सहानुभूतीचे उद्‌गार निघायचे.

मग आई, आजी वाड्यातल्या स्त्रिया जेवायला बसायच्या. त्यांनी तर सकाळपासून काहीच खाल्लेले नसायचे. पण अगोदर आम्हा मुलांना वाढायच्या.

'किती कमी स्वयंपाक होता! इतकी माणसं जेवली तरी अजून शिल्लक आहे!' आई कौतुकाने इतर आयाबायांना सांगायची.

'महाराजांचा हात लागल्यावर कधी कमी पडत नाही!' आजी भक्तीभावाने बोलायची. पण खरा प्रकार वेगळाच असायचा. मुळात, त्या दोघींच्या हाताला थोडे येत नसे. चार-पाच जणी, सकाळपासून स्वयंपाकाला लागलेल्या असत. माणसं वाढतील असा अंदाज आला की स्वयंपाक वाढवायला सांगत. पण जेवताना हे सर्व त्या विसरलेल्या असत.

कुरडई, पापड, भजी यांनी गच्च भरलेलं ताट महाराजांना दिले जायचे. महाराज इतके खाणे शक्य नसे. मग त्यांच्या जेवणानंतर उरलेले ताट आजीकडे सोपवले जायचे. आमची पंगत बसली की आजी त्या ताटातला थोडा थोडा भुगा 'प्रसाद' म्हणून सर्वांच्या ताटात टाकायची.

माझ्या ताटात ती टाकायला लागली की मी म्हणायचो, 'मला नको ते महाराजांच्या ताटातलं उष्टं.'

'शूऽऽऽ असं बोलायचं नसतं. हा 'प्रसाद' थोडा घ्यावा लागतो!' आई दरडावून सांगायची. थोड्याशा रागातच मी ते 'उष्टं' प्रसाद म्हणून खायचो.

जेवण झाल्यावर मी पुन्हा नदीकाठच्या कातळावर बसायचो. राग थोडा कमी झालेला असे. पण एक प्रश्न सतावत राहायचा, 'सकाळी आपण स्वतंत्र एका ताटात घेऊन खात होतो, पण खाऊ दिलं नाही. का? तर संपूर्ण स्वयंपाक उष्टा होतो! आणि आता, चक्क महाराजांच्या ताटातलं 'उष्टं' खायला दिलं. का? 'प्रसाद' आहे म्हणून! हा चमत्कार कसा होतो?'

त्या प्रश्नाचं उत्तर आईकडून, आजीकडून मला कधीच मिळालं नाही!

■■

**आकाश पांढरे**

मु.पो.आष्टी, जि.बीड.

# साधना : दिवाळी २००८ अंकात वाचा...



**विभाग १ : व्यक्तिविशेष**

१ – व्यक्तिचित्र : **फरिद झकारिया** (लेखक-संपादक)
२ – मुलाखत : **मधुर भांडारकर** (सिने-दिग्दर्शक)
३ – आत्मनिवेदन : **अतिश दाभोलकर** (भौतिकशास्त्रज्ञ)

---

**विभाग २ : ललित-वैचारिक**

१ – **मुखपृष्ठाची गोष्ट** – रविमुकुल
२ – **देवदासी नागरत्नम्** – अरुणा ढेरे
३ – **सारंगागाराचे दिवस** – मारुती चितमपल्ली
४ – **परदेशी विद्यापीठांचे आक्रमण** – विद्याधर दाते
५ – **कथात्मसाहित्य : रंग, रूप, दर्जा** – श्याम मनोहर

---

**विभाग ३ : वैचारिक**

१ – **तिरुवल्लुवर, कबीर, तुकाराम** – रमेश देसाई
२ – **जाणीव म्हणजे काय रे भाऊ?** – सुबोध जावडेकर
३ – **शांग्री-ला** – मिलिंद बोकील
४ – **... नेहरू नसते तर?** – प्रकाश बाळ
५ – **धर्मवादी राजकारणाचा वेध** – यशवंत सुमंत

---

**विभाग ४ : मंगेश पाडगावकर यांच्या आठ कविता**

---

**विभाग ५ : नाटक करताना होणारी माझी घुसमट!**

राजकुमार तांगडे, हिमांशू स्मार्त, मोहित टाकळकर, धर्मकिर्ती सुमंत, इरावती कर्णिक, मनस्विनी लता रवींद्र व विकास आबनावे (या विभागाचे अतिथी संपादक : **अतुल पेठे**)

---

**विभाग ६ : आंतरराष्ट्रीय कथा** (हा विभाग **'केल्याने भाषांतर'** मासिकाच्या सौजन्याने)

पॉवर विन्डो (हिंदी) : अरुण मिश्र,
वधू (जर्मन) : डोरिस ड्योरी, दोन शब्द (स्पॅनिश) : इसाबेल आयेंदे,
परिवर्तन (फ्रेंच) : फ्राँस्वा कोपे, ढकलगाडी (जपानी) : र्‍युनोसुके अकुतागावा,
सांडलेले कण (रशियन) : अलिक्सांदर सल्ज़्हिनित्सिन

---

**विभाग ७ : मराठी कथा**

**धानाधिस्पट** : प्रतिमा जोशी, **विहार** : प्रज्ञा दया पवार, **नवा धडा** : कृष्णात खोत

---

**एकूण पाने : ३६०, किंमत रु. ८० /-**

---

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.डब्ल्यू./डब्ल्यू/६८/२००६-२००८
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केटयार्ड पी.एस.ओ. सॉर्टिंग ऑफिसमधून

# साने गुरुजींनी स्थापन केलेल्या

# हीरकमहोत्सवी साधना साप्ताहिकाच्या

# बालकुमार विशेषांकाला

# शुभेच्छा!

●

**डेकोरेल परिवार**

परंपरा
१२ वर्षांची, विविध आकार आणि प्रकारच्या खिडक्यांना सजविण्यारी!



Decorail
CURTAIN RODS
विविध २० प्रकारात उपलब्ध

AJAY WINDECOR PRODUCTS PVT. LTD.
Nirma Park, Building 3-B-1, Padmavati,
Pune - 411 043. Ph 24375460/61 Fax: 24375463
E-mail: decorail@vsnl.com Internet- http://www.decorail.com

• डेकोरेल क्लासिक • डेकोरेल गोल्ड • डेकोरेल मिनी • डेकोरेल रोमन • डेकोरेल फास्ट ट्रॅक • डेकोरेल ग्रिप ट्रॅक • डेकोरेल फ्लेक्सी
• डेकोरेल राऊंड रॉड • डेकोरेल शटर स्प्रिंग • डेकोरेल शटर बॉल कार्ड • डेकोरेल प्रिमियम • डेकोरेल टेन्शन रॉड